साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १७ वा | सोमवार, दि. ११/०५/२०२६ ते दि. १७/०५/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## सोमनाथ मंदिर भारताच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक–राज्यपाल जिष्णु देव वर्मा

### सोमनाथ स्वाभिमान पर्व–अतूट आस्थेचे १००० वर्षी या विशेष भक्तिपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन






मुंबई – सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा 'सोमनाथ स्वाभिमान पर्व – अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते. यावेळी इलेक्ट्रानिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तथा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त अशोक भन्साळे यांनीही महादेवाचे दर्शन घेतले. यानंतर मान्यवरांनी 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' प्रदर्शनालाही भेट दिली. सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेच्या ७५ वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना संबोधित करताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्वावर प्रकाश टाकला. महमूद गझनीपासून औरंगजेबापर्यंत अनेक परकीय आक्रमकांनी मंदिर उद्धस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिराचे अस्तित्व आणि त्यामागील श्रद्धा कधीही नष्ट होऊ शकली नाही, असे त्यांनी सांगितले. भारत हा केवळ भौगोलिक देश नसून तर तो एक चिरंतन संस्कृती आहे. विविध मंदिरे, साधू-संत आणि सनातन परंपरेमुळे भारताचा आत्मा आजही जिवंत आहे. 'सनातन' म्हणजे ज्याचा अंत नाही आणि सोमनाथ मंदिर हे त्याचे जिवंत उदाहरण आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना शुभदा वराडकर यांच्या नृत्याविष्काराने झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचा समृद्ध आविष्कार त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. सादर झालेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## शिंदखेडा तालुक्यात जनगणनेत नाविन्यपूर्ण उपक्रम

### घुसरे गावातील ४० कुटुंबांची स्वगणना पूर्ण



धुळे – शिंदखेडा तालुका जनगणना कर्मचाऱ्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मूठ गावाच्या धर्तीवर नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत घुसरे (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथे ४० कुटुंबाची स्वगणना यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या उपक्रमांतर्गत गावातील सर्व ४० कुटुंबांची प्रत्यक्ष स्वगणना करून घेण्यात आली. घुसरे गावाची एकूण लोकसंख्या १६० असून सर्व कुटुंबानी या प्रक्रियेसाठी प्रतिसाद दिला. ही स्वगणना उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, **(पान ४ वर)**

## वीरमाता इंदुबाई सूर्यवंशी यांना शेतजमिनीचे दस्तऐवज प्रदान



धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी यांची भेट घेतल्यानंतर जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निर्देशांची जिल्हा प्रशासनाने आठ दिवसांत पूर्तता केली आहे. त्यापैकी वीरमाता इंदुबाई गबाजी सूर्यवंशी (रा. विश्वनाथ, ता. धुळे) यांना २ हेक्टर जमिनीचे दस्तऐवज पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते इंदुबाई सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार आदी उपस्थित होते. शहीद सैनिक पंढरीनाथ गबाजी सूर्यवंशी यांना २८ जून १९९९ मध्ये ऑपरेशन रिन्हो मोहिमेत वीरमरण प्राप्त झाले होते. इंदुबाई सूर्यवंशी या पंढरीनाथ सूर्यवंशी यांच्या मातोश्री आहेत. त्यांना जिल्हा प्रशासनाने वरपाडे, ता. शिंदखेडा येथील गट क्रमांक २३७ मधील २ हेक्टर जमीन दिली आहे. या जमिनीचे दस्तऐवज प्रदान करण्यात आले. पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले की, **(पान ४ वर)**

## जागतिक परिचारिका दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिर संपन्न







धुळे (जिमाका) – १२ मे जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून जिल्हा रुग्णालय, धुळे येथे महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशन, जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय तसेच भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांच्या शुभहस्ते फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महेश भडांगे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. अभय शिनकर, डॉ. गीतांजली सोनवणे, महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशनच्या अध्यक्षा श्रीमती प्रतिभा घोडके, सहाय्यक अधिसेविका श्रीमती शोभा पवार, परिसेविका श्रीमती वंदना मोरे, श्रीमती दिपाली मोरे, श्री अमरजीत पवार, श्री कमलेश परदेशी, श्री किशोर हलगीर, श्री ओमकार बनस्वाल, श्रीमती प्रीती खरात, श्रीमती दिपाली गांगुर्डे, श्री भागवत ठाकरे, श्री सागर बडवर, श्री हेमंत देवरे, श्री सतीश वैद्य, श्री संजय चौधरी, श्रीमती पल्लवी सोनवणे, डॉ. विशाखा पांढरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरामध्ये २० ते ३० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. उपस्थित मान्यवरांनी रक्तदान हे श्रेष्ठ दान असून समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत नागरिकांनी नियमित रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# ना. रावलांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगामच्या अनुषंगाने आढावा सभा संपन्न

दिनांक ०८/०५/२०२६ रोजी मा.ना.श्री. जयकुमार रावल, पालकमंत्री, धुळे तथा मंत्री, पणन व राजशिष्टाचार, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगाम २०२६ च्या अनुषंगाने आढावा सभा संपन्न झाली. दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे खरीप हंगामाच्या अनुषंगाने मा.ना.श्री. जयकुमार रावल, पालकमंत्री, धुळे तथा मंत्री, पणन व राजशिष्टाचार, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली आढावा सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर आढावा सभेस मा. ना. श्रीमती. शोभाताई बच्छाव खासदार, धुळे मा.ना.श्रीमती. मंजुळाताई गावीत, आमदार, साक्री, मा. श्रीमती. भाग्यश्री विसपुते,(भा.प्र.से.)जिल्हाधिकारी, धुळे, मा.श्री. अजीज शेख, (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, मा. श्री.विशाल आनंद सिंगुरी, (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, धुळे मा.श्री. राजेश इंगळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, मा.श्री. सुरज जगताप, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे तसेच श्रीमती. कावेरी राजपुत, कृषी विकास अधीकारी, जिल्हा परिषद धुळे व जिल्हयातील कृषि व सलंग्न क्षेत्रातील पदाधिकारी, मा.श्री. नारायण पाटील, सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचा, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली माहिती पुस्तीकेचे मा. पालकमंत्री, धुळे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच फवारणी करतांना घ्यावयाची काळजी व रासायनिक खतांचा संतुलित वापराबाबतची भित्ती पत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

धुळे जिल्हयाची सर्वसाधारण माहीती व पर्जन्यमान :– धुळे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र ७३२९४५ हेक्टर असून त्यापैकी वन क्षेत्र २०८८९० हे. वहीतीलायक क्षेत्र ४३६६७६ हे., खरीपाचे सरासरी क्षेत्र ३७७४११ हे. रब्बी हंगाम क्षेत्र १६२३२१ हे. तर बागायतीक्षेत्र ७३,०८० हे. आहे. धुळे जिल्हयाची गांवे संख्या ६८६ असून एकुण खातेदार संख्या ३०४३६३ आहे.धुळे जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान ५७१.१० मी. मी. आहे सन २०२५–२६ मध्ये पर्जन्यमान ६९७.०० मी. मी. असून सरासरी पेक्षा १२२.०० टक्के जास्त आहे. तसेच भारतीय हवामान विभागाकडून खरीप २०२६ मध्ये ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. खरीप हंगाम २०२५ पीक पेरणी अहवाल :– धुळे जिल्हयात खरीप हंगामात जिल्हयात ३.७७ लाख हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांखाली पेरणी करण्यात आलेली होती. खरीप २०२६ बियाणे नियोजन :–धुळे जिल्ह्यात खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, कापूस, भात, सुर्यफुल, मका, मूग, सोयाबीन, उडीद, तूर, भुईमूग इ. प्रमुख खरीप पिके घेण्यात येतात. सन २०२६–२७ च्या खरीप हंगामासाठी एकूण ३६४६५ क्विंटल विविध पिकाचे व ९२०१४० लाख कापूस बियाण्याची पाकीटांचे नियोजन करण्यात आलेले आहे. खरीप २०२६ चे खत उपलब्धता :– खरीप २०२६ साठी रासायनिक खतांची मागणी लक्षांत घेवून धुळे जिल्हयाकरीता खरीप हंगाम २०२६ साठी १.१२ लाख मे. टन रासायनिक खतांचे नियोजन करण्यात आलेले आहे. बोगस कृषि निविष्ठांवर निर्बंध ठेवण्यासाठी जिल्हयात ५ भरारी पथके कार्यरत करण्यात येवून दोषींवर सक्त कार्यवाहीच्या सूचना मा. पालकमंत्री महोदयांनी केल्या आहेत. तसेच टोलफ्री क्रमांक १८००२३३४००० या नंबरवर तक्रार असल्यास शेतकरी यांनी संपर्क साधावा. पालकमंत्री महोदयांनी कृषि विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

१. मग्रारोहयो फळबाग योजनेचा आढावा घेवून सन २०२६–२७ मध्ये २००० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्याच्या सूचना देण्यात आल्यात. २. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोग योजनेतर्गत प्रति कृषि सहाय्यक ५ अन्न प्रक्रिया उदयोगाचे प्रस्ताव बनवून योजनेस गती देण्याबाबत सूचना केल्या. ३. शासनाच्या महाडीबीटी प्रणालीवर विविध योजनेतर्गत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गाच्या लाभार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज ऑनलाईन भरुन घेण्याकरीता विशेष मोहीम राबविण्यात यावी याबाबत सूचना करण्यात आल्यात. ४. जिल्हयातील महत्वपुर्ण पिक निहाय उत्पादन व उत्पादक्ता वाढीसाठी मोहीम स्वरुपात १५ में ते १५ जून या कालावधीत सर्व गावांमध्ये बीज प्रक्रिया मोहीम, बियाणे उगवन क्षमता तपासणी, बी.बी.एफ यंत्राव्दारे पेरणी करणे, जमीन आरोग्य पत्रिके नुसार खतांचे व्यवस्थापन करणे इत्यादी बाबींचे सुक्ष्म नियोजन करुन कृषि सहाय्यकामार्फत कार्यक्रम राबविण्याबाबतच्या सक्त सूचना देण्यात आल्या. ५. शेतक–यांचे कापुस तेलबीया कडधान्य पिकांचे उत्पादन व उत्पादक्ता वाढविण्यासाठी जिल्हास्तरावरुन कृषि विभागाच्या विविध मोहीमा राबविण्यात येवून जिल्हयातील विविध पिकांची उत्पादकता १५ ते २० टक्के वाढ होईल असे नियोजन करण्याच्या सुचना देण्यात आल्या. ६. का लष्करी अळी व कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळी यांचा पादुर्भाव कमी करण्यासाठी खरीप हंगाम पुर्व विविध मोहीमा राबविण्यात याव्यात. ७. ॲग्रीस्टॅक योजनेतर्गत जिल्हयातील सर्व राहील्याल्या शेतक–यांची फार्मर आयडी नोंदणी तात्काळ करण्यात यावी या बाबत सुचना देण्यात आल्या. ८. खरीप हंगाममध्ये जिल्हयातील सर्व शेतक–यांना विहीत वेळेत पिककर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हयातील सर्व बँकांना सूचना देण्यात आल्या. ९. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस जिल्हयातील जास्तीत जास्त शेतक–यांना सौर कृषि पंप वितरीत करण्याबाबत सूचित करण्यात आले. १०. जमीनीतीन सेंद्रीय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी सेंद्रीय शेतीकडे शेतक–यांना प्रोत्साहीत करुन रासायनिक खतांचा संतुलित वापर करण्याबाबत सूचना केल्यात. ११. जिल्हयात जास्तीत जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या / उत्पादक गट निर्माण कराव्यात तसेच स्मार्ट योजनेतर्गत मंजुर सर्व कामे विहीत वेळेत पुर्ण करणे. १२. जिल्हयात जमीन आरोग्य पत्रिका अभियान प्रभावीपणे राबविण्यात येवून खरीपहंगाम २०२६ मध्ये प्राप्त ४०००० लक्षांकाप्रमाणे नमने काढून जमीन आरोग्य पत्रिका शेतक–यांना वितरीत करण्यात याव्यात. १३. प्रधानमंत्री पिक विमा योजना व पुर्नररचित हवामान आधारीत फळ पिक विमा योजना जिल्हयात प्रभावीपणे राबविण्यासाठी गावोगावी सभा घेवून पिक विमा अर्ज वाढविण्याबाबत सुचना केल्या. १४. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान योजनेतर्गत जिल्हयातील सर्व पात्र लाभार्थ्यांना योजनेतर्गत लाभ देण्यासाठी विविध मोहीम राबविण्यात यावी. १५. जिल्हयातील महत्वपुर्ण पिकांचे उत्पादन व उत्पादक्ता वाढीसाठी शेतीशाळा यांचे प्रभावी आयोजन करण्यात येवून सदर शेतीशाळांमध्ये स्थानिक लोक प्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात यावे. १६. जिल्हयातील महत्वपुर्ण पिकांची उत्पादन व उत्पादक्ता वाढविण्यासाठी कृषि विभागामार्फत घेण्यात येणारी प्रात्याक्षिके / प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येवून क्रॉपसॅप योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. १७. कृषि विभागाच्या राबविण्यात येणा–या महाडीबीटी पोर्टलवरील विविध योजनेतर्गत देण्यात येणारे घटक सुक्ष्म सिंचन, शेडनेट, पॉलीहाऊस, पॅकहाऊस, कांदाचाळ, सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, ड्रॅगन फ्रुट लागवड, अंजीर लावगड, मल्चिंग, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, ट्रॅक्टर चलित औजारे इत्यादी बाबी जास्तीत जास्त शेतक–यांपर्यंत पोहचविण्यात याव्यात. १८. बदलत्या हवामान / एलनिनोच्या पार्श्वभुमीवर कमी पर्जन्यमान होण्याची शक्यता असल्यामुळे कृषि विभागाने आपात्कालीन पिक नियोजन शेतक–यांपर्यंत पोहचवावे. १९. नैसर्गिक आपत्ती नंतर प्रशासनाने तात्काळ शेतक–यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करावेत.

**– सुरज जगताप**
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे

# मिलिंद म्हैसकर आणि मनीषा म्हैसकर यांनी केली स्व–गणना

मुंबई – जनगणना २०२७ च्या स्व–गणना प्रक्रियेत (वने व भूसंपादन) महसूल व वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आणि गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी आपली माहिती संगणकाद्वारे (एसई) पोर्टलवर नोंदविली. मंत्रालयातील दालनात यावेळी भारत सरकारच्या सहसचिव तथा राज्याच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे, जनगणना कार्य संचालनालयाचे सहसंचालक संतोष पायस उपस्थित होते. यावेळी डॉ. निरुपमा जे. डांगे यांच्या हस्ते मिलिंद म्हैसकर यांना स्मृतीचिन्ह देण्यात आले. भारतीय जनगणनेच्या इतिहासात प्रथमच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्व–गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्व–गणना ही जनगणनेतील अशी प्रक्रिया आहे, ज्यात व्यक्ती जनगणनेची माहिती वेब पोर्टलद्वारे नोंदवितात. महाराष्ट्र राज्यासाठी स्व–गणना (एसई) पोर्टल १ मे २०२६ ते १५ मे २०२६ पर्यंत कार्यरत राहील. जनगणना प्रगणक जेव्हा घरी भेट देतील, तेव्हा स्व–गणनेद्वारे नोंदविलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणासाठी त्यांना स्व–गणना आयडी (एसई आयडी) देणे आवश्यक असेल. राज्यातील प्रत्येक व्यक्तीने ही जबाबदारी स्वीकारून मोठ्या संख्येने 'स्व–गणना' सुविधेचा पर्याय निवडण्याचे आवाहन मिलिंद म्हैसकर आणि मनीषा म्हैसकर यांनी केले, जेणेकरून कुटुंबांची नोंद अचूकता आणि कार्यक्षमतेने होईल. राज्यातील जास्तीत जास्त व्यक्तींनी आपल्या कुटुंबाची माहिती जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व–गणना प्रक्रियेत एसई पोर्टलवर नोंदवून जनगणनेच्या देशव्यापी स्व–गणना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी यावेळी केले.

# १५ वर्षाखालील मुलींच्या धुळे जिल्हा क्रिकेट संघासाठी निवड चाचणीचे आयोजन

शिरपूर – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे दि. १९ मे २०२६ पासून १५ वर्षाखालील मुलींच्या आमंत्रित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत धुळे जिल्हा क्रिकेट संघ सहभागी होणार आहे. त्या अनुंषगाने धुळे जिल्हा क्रिकेट संघाची निवड चाचणी आर. सी. पटेल फॉर्मसी महाविद्यालय मैदान, शिरपूर येथे दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता आयोजित केली असून त्याच दिवशी संघाची निवड होणार आहे. दि. १ सप्टेंबर २०११ ते दि. ३१ ऑगस्ट १०१४ या कालावधीमध्ये जन्मलेल्या खेळाडूनाच निवड शिबिरात सहभाग घेता येईल.

तसेच निवड झालेल्या संघाचे सराव शिबिर लगेच दि. १५ ते १६ मे २०२६ दरम्यान शिरपूर येथेच होणार असून दि. १६ मे २०२६ रोजी संध्याकाळी संघ शिरपूर येथून स्पर्धेसाठी परस्पर रवाना होणार आहे. तरी निवड चाचणीत सहभाग घेवू इच्छिणाऱ्या महिला क्रिकेटपटूंनी अधिक माहितीसाठी प्रशिक्षक पूजा जैन, (मो. ९६०७५५१३०५) यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

टिप : निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. क्रिकेटपटूंनी मुक्कामाची तयारी करुन यावे. आवश्यक ते कागदपत्रे सोबत ठेवावीत. तरी धुळे जिल्हातील १५ वर्षाखालील खेळाडू मुलींनी जास्तीत जास्त खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभाग घ्यावा असे आवाहन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी केले आहे.

# धुळे एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या भाग्येश जोशीची दुहेरी कामगिरी ; राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये घवघवीत यश

धुळे – धुळे येथील एस. व्ही. के. एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी भाग्येश जोशी याने अल्पावधीतच दोन प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. गुजरातमधील गांधीनगर येथे गांधीनगर विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'क्राफ्टाथॉन २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत त्याने 'ए–आय –आधारित व्हायरल मजकूर आणि डिजिटल मार्केटिंग सहाय्यक' या अत्याधुनिक संकल्पनेवर आधारित प्रकल्प सादर केला. 'एआय टेक' या थीमअंतर्गत झालेल्या या स्पर्धेत त्याने उत्कृष्ट सादरीकरण व नाविन्यपूर्ण कल्पनांच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल त्याला ट्रॉफीसह रु. १५,००० चे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यानंतर, एनएमआयएमएस, शिरपूर कॅम्पस येथे सोबस (सोबस) सेंटर फॉर एक्सलन्स फॉर इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्योरशिप व आयआयसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इनोव्हेंट २०२६' या स्पर्धेतही त्याने आपल्या कल्पकतेची छाप पाडली. 'आयडिया – इनोव्हेशन – इम्पॅक्ट' या थीमवर आधारित या स्पर्धेत त्याने 'ग्रामीण शाळेसाठी डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म' या प्रकल्पाचे 'काम करणारा नमूना पिच (वर्किंग प्रोटोटाइप पिच) सादर केले. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला डिजिटल माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने सादर केलेल्या या प्रकल्पाला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. या स्पर्धेत त्याने उपविजेतेपद पटकावत ट्रॉफीसह रु. १०,००० चे पारितोषिक मिळवले. भाग्येशच्या या यशामागे विभागप्रमुख डॉ. मकरंद शहाडे व प्रा. डॉ. कविता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# शूरवीर छत्रपती संभाजी महाराजांचा

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले. संभाजी महाराजांच्या आई, महाराणी सईबाईंचे निधन महाराज लहान असतानाच झाले. त्यानंतर पुण्याजवळील कापूरहोळ गावची धाराऊ ही स्त्री त्यांची दूध आई बनली. संभाजी महाराजांचा सांभाळ त्यांची आजी राजमाता जिजाबाई यांनी केला.

त्यांच्या सावत्र आई, पुतळाबाई यांनी देखील त्यांच्यावर खूप माया केली. मात्र त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजी महाराजांना पोरकेपणाने वागवले तसेच संभाजी महाराजांच्या राजकीय कारकिर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजी महाराज अत्यंत देखणे आणि शूर होते. तसेच ते अनेक भाषांत विद्याविशारद व अत्यंत धुरंदर राजकारणी होते. राजकारणातील बारकावे त्यांनी भराभर आत्मसात केले होते. मुघल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले तर त्याचा त्यांना भविष्यात उपयोग होईल या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे ९ वर्षांचे होते. शिवाजी महाराज कैदेतून निसटल्यानंतर स्वराज्यापर्यंतची धावपळ संभाजी राजांनी सोसू नये आणि त्यामुळे त्यांना काही काळ सुरक्षित ठिकाणी ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना मोरोपंत पेशव्यांच्या मेहुण्याच्या घरी मथुरेला ठेवले. मुघल सैनिकांचा संभाजी राजांच्या मागचा ससेमिरा थांबवण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून दिली. ते महाराष्ट्रात पोहोचल्यानंतर काही काळाने संभाजी महाराज सुखरूपपणे स्वराज्यात येऊन पोहोचले. इ.स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तोपर्यंत संभाजीराजे राजकारणातील लहान बारकावे आणि रणांगणातील डावपेचांमध्ये तरबेज झाले होते. त्यांच्या विनम्र स्वभावाने राज्याभिषेकासाठी रायगडावर आलेल्या प्रतिनिधींना त्यांनी आपलेसे केले. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर १२ दिवसात जिजाऊंचे निधन झाले. त्यानंतर संभाजीराजांकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.

तरुण संभाजीराजांचे शिवाजी महाराजांच्या दरबारातील अनुभवी मानकऱ्यांशी अनेकदा मतभेद होऊ लागले. संभाजी महाराजांचा अमात्य अण्णाजी दत्तोंच्या कारभाराला सक्त विरोध होता. शिवाजी महाराजांनी अण्णाजी हे अनुभवी आणि कुशल प्रशासक असल्यामुळे त्यांच्या भ्रष्ट कारभाराकडे अनेकदा दुर्लक्ष केले. पण संभाजी महाराजांना ते मान्य होणे कठीण होते. अण्णाजी दत्तो आणि इतर अनुभवी मानकरी संभाजी महाराजांच्या विरोधात गेले. संदर्भ हवा दरबारातील काही मानकरी संभाजी महाराजांना अपमानास्पद वागणूक देऊ लागले; हे केवळ अण्णाजी दत्तोंच्या सांगण्यावरून केले. त्यांच्या विरोधामुळे त्यांना शिवाजी महाराजांबरोबर दक्षिण हिंदुस्थानच्या मोहिमेवर जाता आले नाही. तसेच शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत संभाजी महाराजांचे हुकूम पाळण्यास अष्टप्रधानमंडळाने नकार दिला. त्यामुळे शिवाजी महाराजांना कोकणातील शृंगारपूरचे सुभेदार म्हणून संभाजी महाराजांना पाठवावे लागले.

संभाजी महाराजांना साधुसंतांबद्दल आदरभाव होता. ज्येष्ठ मांत्रिक कुडाळ ग्रामनिवासी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री यांना करून दिलेल्या संस्कृतमधील दानपत्रावरून त्यांचा आदरभाव कळतो. छत्रपती संभाजी महाराजांना राजपद महत्प्रयासाने प्राप्त झाले होते. त्यांनी राजपद प्राप्तीसाठी नवस केला होता आणि त्यांना राज्याधिकार मिळाल्यानंतर तो नवस फेडण्याच्या इच्छेने त्यांनी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री (ज्यांना संभाजी महाराज स्वामी म्हणतात) यांना दरसाल १०,००० पादशाही होनांचे संस्कृत दानपत्र करून दिले. हे दानपत्र संभाजी महाराजांच्या मंचकारोहणानंतर एका महिन्याने म्हणजे दि. २४ ऑगस्ट १६८० (भाद्रपद शुद्ध १० सोमवार शके १६०२) रोजी केले आहे. दानपत्र ३०० से.मी. लांब आणि २३.५ से.मी. रुंद आहे. या दानपत्राच्या सर्वात वर मधोमध संभाजी महाराजांची १६ बुरुजी मुद्रा आहे व

**विशेष लेख...**



खाली सुवाच्य अक्षरात संस्कृतमध्ये २ ओळी लिहिल्या आहेत. त्या स्वतः शंभूराजांच्या हस्ताक्षरातील आहेत.

दि. ६ जानेवारी १६८१ रोजी छत्रपती संभाजी महाराजांनी गोपळभट अग्निहोत्री महाबलेश्वरकर यांच्या पुत्रास लिहिलेल्या पत्रात एक अतिशय समर्पक असे वाक्य आले आहे. ते वाक्य असे, ..राजश्री आबासाहेबांचे जे संकल्पित आहे ते चालवावे हे आम्हास अगत्य... संदर्भ हवा युवराज शंभू राजे छत्रपती झाल्यानंतर त्यांचे अलौकिक आणि अद्भुत अशा कार्याचा जर कुणी आढावा घेतला तर त्याला पदोपदी या वाक्याची प्रचीती येते. त्यांचे राजकीय धोरण, आर्थिक धोरण, प्रजाहितदक्षता या सर्व बाबींमध्ये त्यांनी आपल्या अद्वितीय अशा वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला दिसतो. या प्रमाणेच त्यांच्या धार्मिक धोरणावरही छत्रपती शिवाजी महाराजांचाच ठसा कोरलेला आढळतो.

१. संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे पुत्र महादोबा मोरे यांस छत्रपती संभाजी महाराजांनी वर्षासनाची नेमणूक करून दिली. (दि. १९ ऑगस्ट १६८०) संदर्भ हवा. २. शिवकालातील प्रसिद्ध पाटगावचे मौनीबाबा यांच्या पालखीस भोई व वाजंत्रीची कायमची व्यवस्था लावून दिली. त्यासाठी वार्षिक १२५ होनांचे आज्ञापत्र करून दिले. ३. समर्थ रामदास स्वामींनी अंगापूरच्या डोहात मिळालेल्या राममूर्तीची चाफळ येथे स्थापना करून मंदिर उभारले. तेथील पूजेअर्चेसाठी व नैवेद्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी चैत्र शु. १ शके १५९७ रोजी सनद करून दिली. तीच पुढे छत्रपती संभाजी महाराजांनी चालू ठेवली. तसेच चाफळच्या यात्रेस जमणाऱ्या भाविकांना लष्करातील लोकांचा अथवा मुसलमानी सैन्याचा त्रास होऊ नये व यात्रा यथासांग पार पडावी म्हणून वासुदेव बाळकृष्ण या आपल्या अधिकाऱ्यास आज्ञापत्र लिहिले. ४. चिंचवडचे श्री मोरया गोसावी यांच्या 'माणसांस, शेतापोतांस तसेच गुरांढोरांस काडीचाही तसविज देऊ नये' यासाठी आपल्या लष्करी अधिकाऱ्यास ताकीदपत्र लिहिले. ५. प्रचंडगडाच्या पायथ्याशी गडाच्या संरक्षणासाठी आलेल्या लोकांच्या गाई व म्हशी यांची चराई (वणी) छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजांनी पण माफ केली. ६. श्री समर्थांनी अवतारकार्य पूर्ण केल्यावर त्यांच्या मागे सज्जनगड व चाफळ येथील धर्मादाय ऐवज, उत्सव, देवस्थानांची व्यवस्था, यात्रा, समर्थांच्या निर्वाणस्थळी हनुमानाचे देवालय उभारणे इत्यादी गोष्टींकडे जातीने लक्ष पुरविले. त्या संबंधी आपल्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना, आज्ञा, प्रसंगी ताकीद व कडक शब्दात कानउघाडणी देखील केली आहे. या संबंधी एका पत्रात संभाजी महाराजांनी कऱ्हाड प्रांताचा सुभेदार रंगो विश्वनाथ यांस श्रीचे कार्यास हैगै कराया तुम्हास काय गरज?... अशा स्पष्ट शब्दात खडसावले आहे. ७. चिंचवडच्या देवस्थानास आपल्या लष्कराकडून उपद्रव होतो अशी तक्रार आल्यावर छत्रपती संभाजी महाराजांनी पुणे प्रांताच्या सुभेदार व जुमलेदारांना ..जो धामधूम करील त्याला स्वामी जीवेच मारतील... अशी अत्यंत परखड शब्दात समज दिली आहे. ८. वाई प्रांताचा सुभेदार येसाजी मल्हार यास निंब येथील सदानंद गोसावींच्या मठास दरसाल नेमून दिलेला ऐवज पोचता न केल्याचे कळताच संभाजी महाराजांनी धर्मकार्यात खलेल न करणे. अशा शब्दांत ताकीद दिली आहे. व तेथील आनंदगिरी गोसावी यांना पत्र लिहून धर्माच्या कार्यास अंतर पडणार नाही... असे अभिवचन दिले आहे.

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतर करणाऱ्या झ्रज, पोर्तुगीज, व मुसलमान सत्ताधीशांना कडाडून विरोध केलेला दिसतो.

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्याचा अंमल गोमंतक परिसरात सुरू झाला. तेव्हापासून व्यापारी माणसांकडून घेण्यात येणारा अंगभाडे कर संभाजी महाराजांच्या आज्ञेने माफ करण्यात आला. या संबंधी फोंड्याजवळ अंत्रुज येथील हडकोळण या गावी एक शिलालेख आहे. या शिलालेखात संभाजी महाराजांनी मुख्याधिकारी मामले फोंडा धर्माजी नागनाथ यास करमाफीसंबंधी आज्ञा करताना मराठी अंमलाला उद्देशून खालील वाक्य कोरले आहे.

औरंगजेबाने इ.स. १६८२ मध्ये मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेबाचे सैन्य मराठ्यांच्या सैन्याच्या पाचपटीने जास्त होते तर औरंगजेबाचे साम्राज्य संभाजी महाराजांच्या स्वराज्यापेक्षा कमीतकमी १५ पटींनी मोठे होते. त्याकाळी जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्यांमध्ये औरंगजेबाच्या सैन्याचा समावेश होत होता. तरीही संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हिमतीने लढा दिला. मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंझारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होय. औरंगजेबाच्या सरदारांची अशी अपेक्षा होती की तो किल्ला काही तासांतच शरणागती पत्करेल. पण मराठ्यांनी असा चिवट प्रतिकार केला की तो किल्ला जिंकण्यासाठी त्यांना तब्बल साडेसहा वर्षे लढावे लागले. संभाजी महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना असा जोरदार धडा शिकवला की त्यांची संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत झाली नाही. तसेच त्यांपैकी कोणीही त्यांच्याविरुद्ध उलटू शकला नाही. संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी सर्व शत्रूंशी एकहाती झुंज दिली. इ.स. १६८७–८८ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे परिस्थिती कठीण झाली होती.

इ.स. १६८९च्या सुरुवातीला संभाजी महाराजांनी त्यांच्या महत्त्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलावले. १ फेब्रुवारी, इ.स. १६८९ रोजी बैठक संपवून संभाजी महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने महाराजांच्या नजीकच्या मदतीने संगमेश्वरावर हल्ला केला, फ्रेंच गवर्नर गेनरल मार्टीनने त्याच्या डायरीत याची नोंद करून ठेवली आहे, की जवळच्या माणसांनी दगाफटका केला. कारवाईसाठी गुप्तता बाळगली आणि सर्व कारवाईची आखणी खूपच काळजीपूर्वक केली. मराठ्यांत आणि शत्रूच्या सैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. शत्रूने संभाजीमहाराजांना व त्यांच्यासोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.

छत्रपती संभाजी महाराज संगमेश्वरी पकडले गेल्यानंतर त्यांना वाचवण्याचे प्रयत्न झाले नाही असे नाही. महाराजांना वाचवण्यासाठी प्रयत्न मावळ्यांनी केले पण ते त्यात यशस्वी झाले नाही. यात सर्वात पहिला प्रयत्न हा जोत्याजी केसरकर यांनी केला. पुढे जाऊन अप्पा शास्त्री यांनी देखील महाराजांना सोडवण्याचा प्रयत्न केला पण हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले.

मुघलांनी पकडल्या नंतर संभाजी महाराज आणि त्यांचे सल्लागार कवी कलश यांना औरंगजेबापुढे किल्ले बहादुरगड, आता धर्मवीरगड येथे आणण्यात आले. 'औरंगजेबाने संभाजी महाराजांना सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन करून स्वतंत्र जिवन जगण्याचे' किंवा धर्मांतरण करून इस्लाम धर्म स्वीकार करून मुसलमान बनल्यास जीवनदान देण्याचे मान्य केले. पण संभाजी महाराजांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. त्यानंतर औरंगजेबाने संभाजी महाराज आणि कवी कलश यांची विदूषकाचे कपडे घालून अत्यंत मानहानीकारक अशी धिंड काढण्यात आली. शेवटी दोघांनाही नर्क यातना देउन क्रूरपणे अत्यंत हालहाल करून ठार मारायचा आदेश दिला.

# शेतकऱ्यांना लिंकिंगची सक्ती केल्यास कठोर कारवाई करावी–पालकमंत्री जयकुमार रावल

## जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न



धुळे (जिमाका) – जिल्ह्यात आगामी खरीप हंगामाची तयारी सुरू झाली आहे. या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना बि, बियाणे, रासायनिक खतांची विक्री करताना लिंकिंगची सक्ती केल्यास कठोर कारवाई करावी, असे निर्देश धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात आज सकाळी जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व २०२६ ची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ.शोभा बच्छाव, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, उपवनसंरक्षक मोहन नाईकवाडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, अपर पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा परिषदेच्या कृषी विकास अधिकारी कावेरी राजपूत आदी उपस्थित होते.

जिल्ह्याचा कृती आराखडा तयार करावा – पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, जागतिक कृषी क्षेत्राशी स्पर्धा करताना जिल्ह्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी कृषी विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने जिल्ह्याचा सूक्ष्म कृती आराखडा तयार करावा. त्यानुसार शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, पीक पद्धतीत बदल आणि गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा वापर वाढविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून उत्पादन खर्च कमी व उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत.

कडधान्याचे उत्पादन वाढवावे – जिल्ह्यात ४ लाख ३७ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ३ लाख ७८ हजार २५४ हेक्टर क्षेत्रात खरिपाची पेरणी होते. गेल्या रब्बी हंगामात १ लाख ६२ हजार ३२१ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली होती. जिल्ह्यातील पीक लागवडीलायक क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच जिल्ह्यातील कपाशीचे क्षेत्र वाढविण्यासाठी आराखडा तयार करावा. जिल्ह्यात कडधान्य, तृणधान्य, गळितधान्य, भात, तूर, भाजीपाला, फुलशेती, फळबागा, भुईमूग, सूर्यफूल, मसाला पिकांचे क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्तम बियाणे, खतांचा पुरवठा, प्रशिक्षण शिबिर, पाणी व्यवस्थापन, पीक विमा आणि अर्थसहाय्य योजना, शेतमालाला योग्य बाजारपेठ, कृषी विद्यापीठे व संशोधन संस्थांद्वारे नव्या उपाययोजना कराव्यात.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे – पारंपरिक शेतीऐवजी तंत्रज्ञानाच्या साहायाने शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे वळविण्यासाठी मार्गदर्शन शिबिर, चर्चासत्र, प्रशिक्षण, शेतीशाळा, प्रात्यक्षिकांचे सर्व तालुक्यात आयोजन करावे. त्यांना समाज माध्यमाच्या माध्यमातून कृषी, खते, हवामानाची नियमित माहिती देण्यात यावी. शेतकऱ्यांना बांधावर जावून मार्गदर्शन करावे.

शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी – रासायनिक खते, किटकनाशकांचा वापर कमी करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. बनावट बि–बियाणे,खते, किटकनाशक निविष्ठाधारकांवर वेळोवेळी कारवाई करावी. खतांचा काळाबाजार होणार नाही यासाठी कृषी विभागाने दक्षता बाळगावी. १५ जून पर्यंत जिल्ह्यातील १०० टक्के ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी. नैसर्गिक आपत्तीची माहिती शेतकऱ्यापर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी तालुका आणि जिल्हास्तरावर हेल्पलाईन कार्यान्वित करावी. नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे १५ दिवसांच्या आत पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना सौर कृषीपंपाचे वाटप करावे.

तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा – वीज वितरण कंपनीने तक्रार निवारणसाठी तालुकानिहाय तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा. खरीप, रब्बी हंगामात पाणी सोडण्याचे वेळापत्रक प्रसिद्ध करावे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत अधिकाधिक शेतकऱ्यांचा समावेश होण्यासाठी प्रत्येक गावात ग्रामसभेच्या माध्यमातून माहिती द्यावी. जिल्हा मध्यवर्ती बँक, सोसायटी तसेच राष्ट्रीयकृत बँकेने शेतकऱ्यांना कृषी कर्जाचे वाटप करावे. येत्या खरीप हंगामाचे नियोजन करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना पालकमंत्री श्री. रावल यांनी दिल्या. यावेळी पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते संतुलित खतांचा वापर जागरुकता अभियान २०२६ च्या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. तसेच कपाशीवरील गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. बैठकीस कृषी विभागासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. जगताप यांनी सांगितले की, जिल्ह्यात खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, भात, सूर्यफूल, मका, मूग, सोयाबीन, उडीद, तूर, भुईमूग पिकासाठी एकूण ३६ हजार ४९० क्विंटल विविध पिकाची बियाणे तसेच ९.१७ लाख बीटीयुक्त कापूस बियाणे पाकिटे व २ हजार ५२६ सुधारीत कापूस बियाणे पाकीटे असे एकूण ९.२० लाख पाकिटांची मागणी करण्यात आली आहे. रासायनिक खतांची आवश्यकता लक्षात घेऊन कृषी आयुक्तालय, पुणे यांनी १ लाख १२ हजार ७०० टन खतांचे आवंटन मंजूर केले असून जिल्ह्यात ४६ हजार ९०९ टन रासायनिक खंताचा शिल्लक साठा असे एकूण १ लाख ५९ हजार ६०९ टन रासायनिक खते खरिपासाठी उपलब्ध होणार आहेत.

पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले...

जिल्ह्यात ३.७८ लाख हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीचे उद्दिष्ट विविध पिकांसाठी ३६ हजार ४९० क्विंटल बियाण्याची मागणी एक लाख १२ हजार टन रासायनिक खतांची मागणी रासायनिक खतांचा वापर कमी करण्यावर भर द्यावा नैसर्गिक शेती क्षेत्र वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे माती तपासणी प्रयोगशाळा तातडीने कार्यान्वित कराव्यात अलनिनोच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाने चारा नियोजन करावे. जलसंपदा विभागाने पावसाळ्यातील ड्राय स्पेलमध्ये पाणी उपलब्धतेचे नियोजन करावे. शेतकऱ्यांना बि, बियाणे, खतांच्या उपलब्धतेसाठी पीक कर्ज वितरीत करावे

# आर.सी.पटेल शैक्षणिक संकुल तर्फे आयोजित उन्हाळी क्रीडा, सांस्कृतिक व कला शिबिर २०२६ चा उत्साहात समारोप

शिरपूर – शिरपूर एज्युकेशन सोसायटी व आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट मार्फत आयोजित उन्हाळी क्रीडा व सांस्कृतिक शिबिर २०२६ चा समारोप अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. सांस्कृतिक शिबिराचे आयोजन दि. २३ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान व क्रीडा शिबिराचे आयोजन दि. २३ एप्रिल ते ६ मे २०२६ या कालावधीत करण्यात आले. शिबिराचा समारोप दि. ६ मे २०२६ रोजी आर. सी. पटेल फार्मसी मैदानावर संपन्न झाला. या समारंभाला शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, विश्वस्त अतुल भंडारी, विश्वस्त विजय भंडारी, क्रीडा चेअरमन प्रितेश पटेल, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील, सहभागी शाळांचे मुख्याधापक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे क्रीडा चेअरमन प्रितेश पटेल होते. त्यांनी मार्गदर्शन केले. आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलात आयोजित या शिबिरात संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सुमारे ११३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंवून आपल्या सुप्त कला, क्रीडा व सांस्कृतिक गुणांना वाव दिला. शिबिरात संस्थेतील प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक यांनीही उत्साहात सहभाग घेतला. क्रीडा विभागांतर्गत क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, कराटे, बॅडमिंटन, कॅरम, स्केटिंग, बास्केटबॉल, हँडबॉल, बुद्धिबळ, कुस्ती, थलेटिक्स अशा विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. तर सांस्कृतिक व कला विभागांतर्गत नृत्य, संगीत, गिटार, तबला/दरबुका, भरतनाटयम, कथक, क्लासिकल व वेस्टर्न डान्स, फॅब्रिक पेंटिंग, ग्लास पेंटिंग, कॅलिग्राफी, क्रिएटिव्ह रायटिंग, मेमरी डेव्हलपमेंट अशा विविध उपक्रमांचे तज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात आले. हे शिबीर आर. सी. पटेल मेन बिल्डिंग, आर. सी. पटेल फर्मसी कॉलेज, अमरिशभाई आर. पटेल सी.बी.एस.ई. स्कूल, तालुका क्रीडा संकुल व आर. सी. पटेल आदर्श नगर या ठिकाणी संपन्न झाले.

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. २६ एप्रिल २०२६ रोजी योग सत्राचे आयोजन करण्यात आले. यात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, पद्मासन तसेच अनुलोम–विलोम, कपालभाती, सूर्यनमस्कार यांसारख्या योगप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. दि. २९ एप्रिल २०२६ रोजी झुंबा डान्स सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षक डान्स टीचर विकी आखाडे व शुभम मोहिते व यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सत्रात तब्बल समर कॅम्प सहभागी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दि. ३ मे २०२६ रोजी आयोजित सायकल रॅली हा शिबिरातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. करवंद येथील गोरक्षनाथ मंदिर येथील आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत मुले–मुली मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सांस्कृतिक विभागांतर्गत दि. २८ एप्रिल २०२६ रोजी वाइल्डलाईफ फोटोग्राफी उद्योजक नितीन चव्हाण व कार्टूनिस्ट सेशनसाठी कलाशिक्षक दिनेश धनगव्हाळ यांचे विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे यशस्वी आयोजन शिरपूर एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष माजी मंत्री अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी क्रीडा संचालक डॉ. विनय पवार, स्पोर्ट्स समन्वयक जे. पी. पाटील, क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक, कलाशिक्षक व कर्मचारी यांनी प्रयत्न केले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला, आत्मविश्वासाला आणि नेतृत्वगुणांना नवी दिशा मिळाल्याची भावना पालक व शिक्षकांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन किरण कोळी यांनी केले तर आभार करण शिंदे यांनी मानले.

(पान १ वरून) घुसरे गावातील...

तहसिलदार नितीनकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. नायब तहसीलदार श्रीमती शारदा बागले, लिपिक धर्मेंद्र बागले, ग्रामस्तरीय टीम तसेच ऑपरेटर यांनी समन्वयाने काम करत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली. नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत जनगणना कार्यात सहकार्य केले. इतर गावांनीही घुसरे गावाचा आदर्श घेऊन स्वगणना प्रक्रिया १५ मे २०२६ पूर्वी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

(पान १ वरून) वीरमाता इंदुबाई सुर्यवंशी...

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनी वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी यांची भेट घेतली. त्यावेळी हा वीरपत्नी यांनी जमिनीचा प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत त्याच दिवशी प्रशासनाची बैठक घेतली. एकूण पाच प्रस्ताव प्राप्त होते. त्यांची छाननी केली असता चार प्रस्ताव पात्र ठरले आहेत. त्यानुसार इंदुबाई सूर्यवंशी यांना जमिनीचे दस्तऐवज देण्यात आले. जिल्हा प्रशासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल पालकमंत्री श्री. रावल यांनी समाधान व्यक्त केले.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)